क्र नाम/गु अ/20 टक्के जमिन/ /ज.शा./2017

नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,नागपूर

दि. 8/6/16

प्रति,

सहाय्यक संचालक नगर रचना,
नागपूर सुधार प्रन्यास,
नागपूर.

विषय –शासनाचे दि. 8/11/2013 चे अधिसूचनेनुसार अत्यल्प उत्पन्न गटातील 20 टक्के गाळे म्हाडाला हस्तांतरित करणेबाबत.

शासनाचे दि. 8/11/2013 चे अधिसूचनेनुसार 4000.00 चौ.मी व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या जमिनीवर खाजगी विकासातर्फे करण्यात येणा–या बांधकाम क्षेत्रफळापैकी 20 टक्के बांधकाम अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थीकरिता करावयाचे असून सदर बांधकाम क्षेत्र म्हाडाला हस्तांतरित करावयाचे आहे. नागपूर सुधार प्रन्यासने खालील अभिन्यासाचे मंजूरीबाबत नागपूर गृहनिर्माण मंडळाला कळविले आहे.

| अ.क्र | विकासकाचे नांव | योजनेचे ठिकाण | अभिन्यास मंजूर करण्याचा दिनांक | म्हाडाला हस्तांतरीत करावयाचे क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| 1 | संदीप डेव्हलपर्स, नागपूर | मौजा, दाभा<br>स.नं. 53/2,54,58,59/3 | 21/02/2014 | 1425.26 चौ.मी<br>32 गाळे |
| 2 | ग्रीनसिटी बिल्डर्स, नागपूर | मौजा – झिंगाबाई टाकळी<br>स.नं 247/2 | 07/04/2016 | 3353.44 चौ.मी<br>100 गाळे |
| 3 | एम.एस.बालाजी इन्फास्ट्रकचर, नागपूर | मौजा – चिखली देवस्थान<br>स.नं. 15/3,4,5 | 23/03/2017 | 20 गाळे |

सदर मंजूर अभिन्यासातील 20 टक्के बांधकाम अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थीकरिता म्हाडाला हस्तांतरीत करण्याबाबत संबंधित विकासकाला कळविले आहे. तथापि अद्यापपावेतो एकाही विकासकाने म्हाडाला हस्तांतरीत करावयाचे बांधकाम क्षेत्रफळ म्हाडाला हस्तांतरीत केलेले नाही. आता असे निदर्शनास आले आहे की खाजगी विकासकांनी स्वतःच्या योजनांची कामे सुरु केली असून ब–याच प्रमाणात बांधकाम पूर्ण केले आहे तथापि 20 टक्के अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटातील लाभार्थीकरिता म्हाडाला हस्तांतरीत करावयाचे बांधकामास अद्याप सुरुवात केलेली नाही.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या कार्यालयातर्फे वर नमूद मंजूर अभिन्यास सुधारीत करण्याचा प्रस्ताव आपल्या कार्यालयाला प्राप्त झाल्यास त्यास म्हाडाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्यानंतरच सुधारीत मंजूरी देण्यात यावी.